॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनीधी) दि. ८: कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे पीएच. डी. प्रवेशपूर्व परीक्षा (PET-2026) करीता अर्जांची ऑनलाइन नोंदणी करण्यासाठी दिनांक १८ सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

विद्यापीठाने पीएचडी प्रवेश पूर्व परीक्षा-२०२६ करिता दिनांक २३/०७/२०२६ रोजी परिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले होते. यानुसार ऑनलाइन अर्ज भरण्याची मुदत दिनांक २४/०७/२०२६ ते २४/०८/२०२६ पर्यंत देण्यात आली होती. परंतु NET परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पीईटी परीक्षेकरिता अर्जाची नोंदणी करता आलेली नाही. तसेच, पेट परीक्षेतून सूट मिळण्यासाठी पात्र सेट व इतर पात्र विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार विद्यार्थ्यांचे हित विचारात घेऊन पेट-२०२६ परीक्षेकरिता ऑनलाइन अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे.

संबंधित विद्यार्थ्यांनी दिनांक ०८/०९/२०२६ ते १८/०९/२०२६ सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत या कालावधीत विद्यापीठ संकेतस्थळावर ( www.nmu.ac.in ) ऑनलाइन अर्ज सादर करावेत. या संदर्भातील सुधारित वेळापत्रक देखील विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या तारखांमधील झालेला बदल लक्षात घ्यावा असे विद्यापीठातर्फे कळविण्यात आले आहे.

........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ८ सप्टेंबर, २०२६

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता